महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०९ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०१८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## मध्यस्थी करायला गेले; माघारी परतले....

# मराठी माणसाच्या रोषापुढे सरनाईक नरमले



### मराठी भाषिकांच्या मोर्चाला परवानगी नाकारल्यानं मीरा भाईंदरमध्ये तणाव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मीरा-भाईंदरमध्ये परप्रांतीयांनी नुकताच मोर्चा काढला होता. तेव्हापासून शहरात मराठी विरुद्ध अमराठी असा वाद चालू झाला आहे. दरम्यान, परप्रांतीयांच्या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून आज शहरातील मराठी भाषिकांनी मराठी एकीकरण समिती व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढला. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे देखील या मोर्चात सहभागी झाले होते. मात्र, ते अवघ्या १० मिनिटात ते तिथून निघून गेले. या १० मिनिटात त्यांच्याविरोधात घोषणाबाजी झाली, तसेच एका समाजकंटकाने त्यांच्या दिशेने बाटली भिरकावल्याचा प्रकारही घडला. दरम्यान, त्या १० मिनिटात आंदोलनाच्या ठिकाणी काय-काय घडलं याबाबत प्रताप सरनाईक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी काही वेळापूर्वी विधान भवन येथे प्रसिध्दी माध्यमांशी संवाद साधाला . यावेळी ते म्हणाले, "आंदोलनाच्या ठिकाणी ज्या पद्धतीचं वातावरण होतं ते पाहता मलाही कल्पना होती की तिथे मला विरोध होऊ शकतो. परंतु, मी मोर्चात सहभागी होईन असं सांगून आलो होतो. त्याप्रमाणे मी सहभागी झालो. मोर्चात सहभागी होणं हे माझं कर्तव्य होतं. त्यानुसार मी मीरा भाईंदरला गेलो आणि मोर्चामध्ये सहभागी झालो. पोलिसांनी मला सांगितलं होतं की तुम्ही तिथे गेलात तर वातावरण आणखी खराब होईल. तुमच्या विरोधात घोषणाबाजी होऊ शकते. परंतु, मी पोलिसांना स्पष्ट सांगितलं की मी मराठी जनतेला शब्द दिला आहे. त्यामुळे मी मोर्चामध्ये सहभागी झालो आणि आता विधानभवनाच्या कामकाजासाठी निघालो आहे. असे सांगत त्यांनी माघार घेतली.

मराठी भाषेची सातत्याने गळचेपी होत असल्याने मनसे कार्यकर्त्यांनी व मराठी एकीकरण समिती व अन्य संघटनांनी मंगळवारी एकत्र येत मिरा भाईंदर शहरात बालाजी हॉटेल ते मिरा रोड रेल्वे स्थानक असा मोर्चा काढण्यात आला होता. यात मोठ्या संख्येने मराठी भाषिक नागरिक सहभागी झाले होते. मिरा रोड रेल्वे स्थानकाजवळ मोर्चा पोहचताच त्या ठिकाणी समर्थन देण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दुपारी दीडच्या सुमारास आंदोलन स्थळी भेट दिली. मात्र सरनाईक आंदोलनाच्या ठिकाणी येताच त्यांच्या विरोधात काही आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. तुम्ही गद्दार आहेत. तुम्ही येथून निघून जा अशी घोषणा करण्यात आली त्यामुळे आंदोलन स्थळी मोठा गोंधळ निर्माण झाला होता.




# आज भारत बंदची घोषणा

## कोट्यवधी कामगार आंदोलनात उतरणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या खासगीकरणाच्या आणि कामगार कायद्यांच्या विरोधात देशातील कामगार संघटनेने 9 जुलै रोजी भारत बंदची घोषणा दिली आहे. बुधवारी होणाऱ्या या बंदमध्ये देशभरातील 25 कोटी कामगार भाग घेणार असल्याची माहिती आहे. त्यामध्ये बँकिंग, खाणकाम, पोस्टल सर्व्हिस, बांधकाम यासह अनेक क्षेत्रातील कामगार या बंदमध्ये सहभागी होणार आहे. त्यामुळे देशातील प्रमुख सेवांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

देशातील 10 प्रमुख कामगार संघटनांनी या भारत बंदची घोषणा केली आहे. त्याचसोबत या संघटनांच्या संबंधित इतर कामगार संघटनांही त्यामध्ये भाग घेणार असल्याची माहिती आहे. केंद्र सरकारने कामगार विरोधी, शेतकरी विरोधी धोरण अवलंबल्याचा आरोप या संघटनांनी केला आहे. सरकारच्या या धोरणांचा फायदा केवळ उद्योगपतींना, त्यांच्या उद्योगांना होणार असल्याचा आरोप कामगार संघटनांनी केला आहे.

कामगार संघटनांनी केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया याच्याकडे 17 प्रमुख मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी केली होती. पण केंद्र सरकारकडून त्याला कोणतंही उत्तर देण्यात आलं नाही. त्याचमुळे 9 जुलै रोजी भारत बंदची हाक देण्यात आल्याचं कामगार संघटनांनी म्हटलं आहे.

केंद्र सरकारच्या वतीने घेण्यात येणारी वार्षिक कामगार परिषद गेल्या 10 वर्षांपासून घेण्यात आली नाही. त्याचवेळी सरकारने चार कामगार कायदे अंमलात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यामुळे भविष्यात कामगार संघटना खिळखिळया करण्याचा केंद्राचा प्रयत्न असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

# कल्याण बाजार समितीच्या सभापती, उपसभापती पदासाठी उद्या निवडणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळ निवडणुकी नंतर सभापती, उपसभापती पदासाठी येत्या गुरुवारी 10 जून रोजी निवडणूक होतं आहे. 10 जून रोजी दुपारी 12 वाजता सभापती, उपसभापती निवडणुकीसाठी कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यासाठी संचालकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. यावेळी महायुतीची सत्ता बाजार समितीवर आली आहे.

# वन जमिनींवरील अतिक्रमण भोवणार?

## -गणेश नाईकांचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वन जमिनीचं प्रमाण योग्य राहण्याची गरज आहे. पण, वन जमिनीवर अतिक्रमण करुन अनधिकृत धार्मिक स्थळ निर्माण होत असल्याच्या तक्रारी सातत्यानं येत आहेत. या प्रकारचं अतिक्रमण करणाऱ्यांच्या विरोधात राज्य सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानभेत बोलताना हा इशारा दिला.

**काय म्हणाले वनमंत्री?**

अतिक्रमणाबाबत पुढील दोन महिन्यात माहिती संकलित करण्यात येईल. अतिक्रमित जमिनींवरील अनधिकृत धार्मिक स्थळ निर्मितीच्या बाबी तपासून अशांवर फौजदारी खटला दाखल करून कारवाई करण्यात येईल, असा इशारा वन मंत्री गणेश नाईक यांनी दिला आहे. विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये त्यांनी हा इशारा दिला आहे, वन जमिनींवरील अतिक्रमण करून अनधिकृत धार्मिक स्थळ निर्मिती बाबत सदस्य प्रवीण दटके यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

# शिक्षकानेच लावली दावडी जि.प.शाळेची वाट

## ७० विद्यार्थी पटसंख्या ७ वर

### कल्याण पंचायत समिती शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार सुरूच!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शरद शहाणे

**कल्याण :** कल्याण तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार तसाच सुरु आहे. या कार्यालयाच्या आंतर्गत तालुक्यातील प्राथमिक शाळांचा कारभार सुरु आहे. मात्र ज्या शाळेत विध्यार्थी आहेत त्या शाळेत शिक्षक नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांची विध्यार्थी संख्या झापाट्याने कमी होतं आहे. हे वास्तव चित्र असताना याच शिक्षण विभागा आंतर्गत असलेल्या जिल्हा परिषद दावडी शाळेला याच शाळेला दिलेल्या शिक्षकाने सत्तर विध्यार्थी संख्या असणाऱ्या या शाळेला टाळे लावण्याजोगी परस्थिती निर्माण केली आहे. एक ते सातवी पर्यत वर्ग असणाऱ्या या शाळेत अवघे पाच वर्ग असणाऱ्या या शाळेत अवघे सात विध्यार्थी उरले आहेत. ते देखील अमराठी आहेत या शाळेत नियुक्त केलेले शिक्षक तीन वर्ष विविध आजाराच्या नावाने सतत रजेवर असतात, त्यास तालुका शिक्षण विभागाचा मूक पाठिंबा असतो. या भागातील केंद्र प्रमुख शाळांना भेटी न देता घरी पळ काढतात असे दावडी ग्रामस्थां चे म्हणणे आहे.

दावडी जिल्हा परिषद शाळेची दोन मजली इमारत धूळ खात पडली आहे. शिक्षक भावी पिढी घडवतात असे म्हणतात दावडी जिल्हा परिषद शाळेवर नियुक्त केलेल्या शिक्षकांनीच या शाळेला टाळे लावण्या सारखी परस्थिती केली आहे. यामुळे ग्रामस्थ सतप्त झाले आहेत.

> दावडी जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या टिकावी यासाठी आम्ही ग्रामस्थ प्रयत्न करत आहोत; मात्र येथील दांडीबहद्दर शिक्षक आणि कामचोर केंद्रप्रमुख यांच्यामुळेच या शाळेतील विध्यार्थी संख्या कमी झाली आहे. त्यामुळे या दोघांना निलंबित करा.
>
> ● जालिंदर पाटील.
> माजी सरपंच दावडी.

> शिक्षक तीन वर्ष सुट्ट्या घेतो, त्याचा पगार कसा काय दिला जातो? शिक्षण विभागाच्या ह्या बेजबाबदारपणाची चौकशी करून कारवाई करा.
>
> ● मनोज पाडे, पालक

# विधिमंडळाच्या पायऱ्यांवर विरोधकांची घोषणाबाजी



### मंत्री नितेश राणे , विधान परिषद उपसभापती नीलम गोरे मंत्री संजय शिरसाठ यांना डिवचलं

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कामकाजाच्या सातव्या दिवशी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश महाराष्ट्राच्या विधान भवनात येत असताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवणाऱ्या सरकारचा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन केले. यावेळी विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवणे हे विधिमंडळाच्या प्रथा परंपरांना साजेसे नाही, त्यामुळे विधानसभेच्या कामकाजावर विरोधकांनी बहिष्कार टाकत निषेध केला. तसेच विरोधकांनी सत्ताधारी नेत्यांना बोचरी टीका करत डिवचल्याचे समोर आले.

आज सकाळी विरोधकांनी विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकत सभात्याग केला. यानंतर विधिमंडळाच्या पायऱ्यांवर बसत चीफ जस्टिस न्याय द्या, चीफ जस्टिस न्याय द्या... असे म्हणत विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली. तसेच विरोधकांनी सत्ताधारी नेत्यांवर वेगवेगळ्या मुद्यावरून घोषणाबाजी केली. याबाबतचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# मुंबई बाजार समिती नवी मुंबईतून होणार हद्दपार ?

## प्रशासन स्तरावर हालचाली सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** मुंबईतील वाढती लोकवस्ती, वाहतुकीचे प्रश्न आणि जागेची अनुपलब्धता या कारणांसाठी ८०च्या दशकापासून टप्प्याटप्प्याने नवी मुंबईतील वाशी येथे स्थलांतरित करण्यात आलेली मुंबई कृषी उत्पन्न बाजारसमिती आता नवी मुंबईच्याही बाहेर फेकली जाण्याची शक्यता आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या नियोजनबद्ध विकासासाठी नेमण्यात आलेल्या ग्रोथ हब नियामक मंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा झाली असून त्यात वाशी येथील एपीएमसीच्या जागेचा 'सहविकास' करण्याचे नियोजन आहे. त्यात एपीएमसीसाठी १५ जुलैपर्यंत जागेचा पर्याय सुचवण्याच्या सूचना नवी मुंबई महापालिकेला देण्यात आल्या आहेत.

राज्यातील सर्वाधिक उलाढाल होत असलेली बाजारपेठ म्हणून गणल्या जाणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचा सध्याचा पसारा जवळपास १८० एकर जागेवर विस्तारला आहे. एवढी मोठी जागा नवी मुंबई परिसरात एकत्रितपणे सापडणे कठीण आहे. ते पाहता, या बाजारपेठा नवी मुंबईच्या बाहेरच स्थलांतरित होण्याची दाट शक्यता आहे. या व्यतिरिक्त एपीएमसीच्या सध्याच्या जागेची पुनर्रचना करून तिचे आकारमान कमी करण्याचा पर्यायही आजमावता येईल, अशी सूत्रांची माहिती आहे.

मुंबई महानगर प्रदेशाचा नियोजनबद्ध विकास व्हावा यासाठी तयार करण्यात आलेल्या ग्रोथ हब नियामक मंडळाची एक बैठक काही दिवसांपूर्वी मंत्रालयात पार पडली. त्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार 'एपीएमसी च्या १०० एकर जागेचा सहविकास या मुद्द्यांतर्गत वाहतूक सुविधा आणि मालाच्या ने-आणीसाठी सुलभता यांचा अभ्यास करून पर्यायी जागेबाबत नवी मुंबई महापालिकेने बाजार समिती प्रशासनाशी चर्चा करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी महापालिकेला १५ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.










# मराठीचा मोर्चा दडपण्यासाठी दबावतंत्र ?

## प्रशासन आणि पोलिस यंत्रणेवर थेट आरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**डोंबिवली :** मीरा-भाईंदर परिसरात मराठी एकीकरण समिती आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मिळून एक मोठा पाऊल उचलले आहे. मराठी माणसाच्या हक्कासाठी आवाज उठवणाऱ्या या संघटनांनी स्थानिक प्रशासन आणि पोलिस यंत्रणेवर थेट आरोप केले आहेत.

प्रकाश भोईर, मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष, यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "मीरा-भाईंदरमध्ये मराठी भाषेचा आणि संस्कृतीचा गळा दाबण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हिंदी भाषेला पुढे करण्यासाठी दिल्लीहून आदेश येत आहेत आणि त्यानुसार येथे मराठीची पिळवणूक केली जात आहे."

मनसे आणि मराठी एकीकरण समितीने नुकतीच प्रशासनाला एक नोटीसही पाठवली आहे. त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला असून, हे प्रकरण अधिक तापले आहे. "मराठी माणसाचं गळचेपीचं राजकारण सुरू आहे. आम्हाला झुकवण्यासाठी दबावाचा वापर केला जात आहे, पण मनसे अशा गोष्टींना भीक घालणार नाही," असंही प्रकाश भोईर यांनी ठणकावून सांगितलं.

राज ठाकरेंनीही यावर भाष्य करताना म्हटलं की, "आमची सत्ता रस्त्यावर आहे. आम्ही लोकांच्या हक्कासाठी रस्त्यावर लढायला तयार आहोत." सध्या मनसे कार्यकर्त्यांची एक टीम मीरा-भाईंदरमध्ये दाखल झाली असून, मागची टीमही तयार असून वाट बघत आहे.

या पार्श्वभूमीवर मीरा-भाईंदरमध्ये मराठी अस्मितेसाठी लढा पेटण्याची शक्यता वाढली आहे. स्थानिक नागरिकांमध्येही यावरून चर्चेला उधाण आले असून, पुढील काही दिवसात आंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## गीतासार



### अध्याय १५
### पुरुषोत्तमयोगः

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः । अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १५-१८ ॥

कारण मी नाशवान जडवर्ग-क्षेत्रापासून तर पूर्णपणे पलीकडचा आहे आणि अविनाशी जीवात्म्यापेक्षाही उत्तम आहे. म्हणून लोकांत आणि वेदांतही पुरुषोत्तम नावाने प्रसिद्ध आहे. ॥ १५-१८ ॥

यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम् । स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १५-१९ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), जो ज्ञानी पुरुष मला अशा प्रकारे तत्त्वतः पुरुषोत्तम म्हणून जाणतो, तो सर्वज्ञ पुरुष सर्व रीतीने नेहमी मला वासुदेव परमेश्वरालाच भजतो. ॥ १५-१९ ॥

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ । एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ १५-२० ॥

हे निष्पाप भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), असे हे अतिरहस्यमय गुप्त शास्त्र मी तुला सांगितले आहे, याचे तत्त्वतः ज्ञान करून घेतल्याने मनुष्य ज्ञानवान आणि कृतार्थ होतो. ॥ १५-२० ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुन संवादे पुरुषोत्तमयोगो नाम पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील पुरुषोत्तमयोगः नावाचा हा पंधरावा अध्याय समाप्त झाला. ॥ १५ ॥

# मोकाट श्वानांसाठी अँन्टी-रेबीज लसीकरण मोहीम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) : वासिंद येथील ग्रामपंचायत विभाग व पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-2 वासिंद यांच्या माध्यमातून मोकाट कुत्र्यांना अँन्टी-रॅबिज लसीकरण मोहीम राबविण्यात आली.



वासिंद शहरात सध्या मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचे उपद्रव वाढले असून वासिंद मधील अनेक नागरिकांना चावा घेतल्याच्या घटना घडल्यामुळे अनेक नागरिक, विद्यार्थी दुकानदार भयभीत झाले आहेत. या मोकाट कुत्र्यांचा वेळीच बंदोबस्त करावा यासाठी येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेना पदाधिकारी व काही नागरिकांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. वासिंद ग्रामपंचायत व्हिडिओ कार्यालय शहापूर येथेही मनसेच्या वतीने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचे निवेदन दिले होते. वासिंद शहरात रोजनिशी आजूबाजूच्या खेड्यापाड्यातील अनेक विद्यार्थी, ग्रामस्थ ये-जा करीत असतात. परंतु या वाढत्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

या अनुषंगाने ग्रामपंचायत विभाग यांनी पुढाकार घेऊन भिवंडी येथील कुत्री पकडणाऱ्या व्यक्तींच्या माध्यमातून तसेच पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-2 यांनी केलेल्या लसीकरण पुरवठा या सहकार्याने दोन दिवस कुत्र्यांना अँन्टी-रॅबिज लसीकरण करून ही मोहीम राबविण्यात आली. यामध्ये जवळपास दिडशे मोकाट कुत्र्यांना लसीकरण करण्यात आले असल्याचे ग्रामपंचायत विभागाकडून सांगण्यात आले.

या लसीकरण मोहीमवेळी माजी उपसरपंच सागर कंठे, ग्रामविकास अधिकारी वैभव पडवळ, पशुवैद्यकीय रुग्णालय परिचय अरुण अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य विनोद म्हसकर, प्रदीप भालेराव, अरुण भांगरे आदी कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. घाटे यांची शिकवण आणि सेवाभाव दिपस्तंभासारखे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**- जीवन पाटील**

पेण : पेण तालुक्यातील सोनखार गावातील सन 1972 सालची घटना गावात शाळा होती पण ती मठात भरायची त्यावेळी तिसरीच्या वर्गातील फक्त आठ वर्षाचा मी विद्यार्थी.घरात तांदळाच्या पोत्यांच्या वर ठेवलेला मोठा लाकडी वासा अचानक खेळत असताना डोक्यावर कोसळला... आणि त्या एका क्षणाने माझ्या आयुष्यचं चित्रच बदललं पाहता पाहता होत्याच नव्हतं झालं जर तेव्हा तो माणूस, खरंतर तो देवदूत, वेळेवर पोहोचला नसता तर... माझं जीवनच संपून गेलं असतं

पण एक देवदुता सारखा माणूस पेणचे सुप्रसिद्ध डॉ. गजानन विनायक घाटे. माझे वडील श्री शंकर हिराजी पाटील , प्राथमिक शिक्षक यांचा आणि डॉक्टर घाटेंचा अत्यंत जवळचा संबंध. त्वरितच माझ्या वडिलांनी घाटे डॉक्टरांचा दवाखाना गाठला. पेण शहरातील हनुमान आळीतील एक साधे पण अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्त्व डॉक्टर घाटे. त्यांचा पेहराव पाहिला तर धोतर, स्वच्छ पांढरा शर्ट, त्यावर काळा कोट, डोळ्यावर चष्मा, हातात काठी, रात्र असेल तर सोबत कंदील आणि वाहन म्हणून... घोड्याचा टांगा! त्यांच्या सोबत नेहमी असायचे त्यांचे विश्वासू कंपाउंडर श्री हरचन. त्या काळात पेण शहरापासून आठ किलोमीटरवर सोनखार गावात पोहोचण्यासाठी कोणतेही यांत्रिक वाहन नव्हते. रस्ते नव्हते, सुविधा नव्हत्या पण डॉक्टरांनी अंतराचं, वेळेचं किंवा अडचणींचं कधीच बंधन मानलं नाही.

त्या दिवशी त्यांनी सोनखार गाठलं, माझ्या जीवासाठी.तात्काळ उपचार दिले आणि माझं आयुष्य वाचवलं. आजही त्या घटनेची जखम माझ्या डोक्यात आहे, पण ती एक स्मृती ठरली आहे – डॉक्टरच्या सेवेची, करुणेची आणि वेळीच केलेल्या मदतीची.ते फक्त डॉक्टर नव्हते तर ते एक चालतं-बोलतं आदर्श होतं.शिस्त, सेवाभाव, नि:स्वार्थपणा आणि माणुसकी यांचा मिलाफ म्हणजे डॉक्टर घाटे.

त्यांचा दवाखाना होता पेण शहरातील हनुमान आळीमध्ये, आणि निवास झिराळ आळीमध्ये. त्यांची प्रत्येक हालचाल नेमकी, वेळेवर आणि नियमात असायची. रुग्ण ही त्यांच्यासाठी नुसती 'केस' नव्हती तर ती एक जबाबदारी होती. सेवा हीच त्यांची पूजा होती.

आज मी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता खात्यात 36 वर्षांची सेवा करून निवृत्त झालो आहे.पण या संपूर्ण प्रवासाची खरी सुरुवात झाली ती त्या अपघाताच्या दिवशी आणि डॉक्टरच्या हातून.त्यांनी दिलेली सेवा, वेळेवर दाखवलेली तत्परता, आणि मनापासून केलेली मदत हे सगळं मला आयुष्य भरासाठी दिशा देणारं ठरलं. डॉक्टर दिनानिमित्त त्यांच्या विषयीचा आदरभाव व्यक्त करताना माझ्या स्मरणात शब्द टाकताना मन गहिवरून येतं.त्यांच्या सेवेचा ठसा केवळ माझ्यावरच नव्हे, तर संपूर्ण पेण तालुक्यातील गावागावांवर उमटलेला आहे.ते आज आपल्या सोबत नाहीत – पण त्यांची शिकवण, त्यांचा सेवाभाव आणि त्यांची माणुसकी ही आजही आपल्यासाठी दीपस्तंभासारखी आहे. विशेष म्हणजे त्यांची कन्या उषा भागवत ह्या देखील एक डॉक्टर आहेत, आणि त्यांचे पती सुरेश भागवत, म्हणजेच 'नुक्कड'या गाजलेल्या हिंदी मालिकेतील लोकप्रिय पात्र हे घाटे डॉक्टरचे जावई. तसेच डॉक्टर अदिती ही डॉक्टर घाटे यांची नात. हा वारसा आहे सेवाभावाचा जो पिढ्यानपिढ्या पुढे जातोय.या महान डॉक्टर घाटे ना, एक जीवनदायी देवदूत समजून मी व माझं संपूर्ण कुटुंब, डॉक्टर दिनानिमित्त मन:पूर्वक, भावपूर्ण विनम्र आदरांजली अर्पण करतो. कारण त्यांनी मला जीवदान देऊन आज मला हे चांगले दिवस पाहायला मिळाले त्यांचे अनंत उपकार माझ्यावर कालही होते आजी आहेत उद्याही राहतील यातील मत शंका नाही.

### एमआयडीसी अधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून
# बारवी प्रकल्पग्रस्त दांपत्यांच विष प्राशन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड तालुक्यातील सुकाळवाडी येथील बारवी प्रकल्पग्रस्त शेतकरी दांपत्याने एमआयडीसी अधिकाऱ्यांच्या लाचखोरपणाला कंटाळून चक्क आपली जीवनयात्रा संपविण्यासाठी कीटकनाशक प्राशन केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून यात पीडित पतीचा गुरुवारी मृत्यू झाला तर मृतकाचा पत्नीवर उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



**पतीचा मृत्यू**
**पत्नीची मृत्यूशी झुंज**

याबाबत प्राप्त माहितीवरून, मंगल गोमा उघडा (वय ४५ वर्षे) असे मृत पावलेल्या बारवी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याचे नाव असून मुलाच्या अपघाती मृत्यू पश्चात त्याची शासकीय नोकरी आपल्या मुलीला वर्ग करण्यासाठी त्यांनी एमआयडीसी अधिकाऱ्यांकडे अनेक पत्रव्यवहार तसेच हेलपाटे मारले होते. परंतु अधिकारी वर्ग दाद देत नसल्याने उघडा दांम्पत्यानी अखेर टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. यात मंगल उघडा यांचा बळी गेला तर पत्नी सुमनची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते.

बारवी प्रकल्पग्रस्तांना घरटी नोकरीतून मयत मंगल उघडा यांचा मुलगा करण हा नवी मुंबई महानगर पालिकेत कामावर रुजू असताना दि. ८ मार्च २०२३ रोजी त्याचे अपघाती मृत्यू झाल्याने त्याच्या जागी मुलगी कल्पना हिला नोकरीत रुजू करून घ्यावे यासाठी मंगल यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील पुर्नवसन विभागाकडे दि. २६ एप्रिल २०२३ रोजी रितसर अर्ज सादर केला होता. त्यावर काही कार्यवाही न झाल्याने मंगल यांनी अंबरनाथ येथील बारवी धरण विभागाचे कार्यकारी अभियंता यांना दि. २८ एप्रिल २०२३ रोजी त्याच विषयांन्वये अर्ज सादर केले. शिवाय याबाबत आ. किसन कथोरे यांनी देखील मुंबईच्या अंधेरी येथील एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि. २२ मे २०२३ रोजी याच प्रकरणी शिफारस पत्र दिले होते. परंतु त्याची सुध्दा दखल न घेतल्याने अखेर उघडा दांपत्यांनी डोंबिवली येथील अधीक्षक अभियंता यांचेकडे निवेदन सादर करून आमच्या जगण्याचे एकमेव साधन अर्थात त्यांच्या मुलीला नोकरीत रुजू करून न घेतल्यास दोहों पती - पत्नी यांना आत्महत्ये शिवाय पर्याय नसल्याचे नमूद केले होते. मात्र गेंड्याच्या कातडीच्या एमआयडीसी अधिकाऱ्यांनी उघडा कुटुंबियांना मृत्यूला कवटाळण्यास भाग पाडले. तर या घटनेमुळे तालुक्यात संतापाची लाट पसरली आहे. घडलेल्या या प्रकाराबाबत अंबरनाथ येथील एमआयडीसी विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र छत्रे यांना मोबाईल फोनद्वारे विचारले असता मला काही माहिती नसल्याचे सांगून आपल्याकडे तो विषय नाही, असे उत्तर दिले.

या नोकरी कामी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी उघडा यांचेकडे मागणी केलेल्या मोठ्या रक्कमेची पूर्तता करण्यासाठी असमर्थ असल्याने उघडा दाम्पत्यानी हतबल होऊन हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. तरी याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. मात्र मागील काही वर्षांत बारवी धरण पुनर्वसन आर्थिक उलाढालीमुळे जोरदार चर्चेत राहिला आहे. कोट्यवधी रुपयांची कामे या पुनर्वसनाच्या माध्यमातून आजवर सुरूच आहे. पुनर्वसित क्षेत्रात लाखो-करोडो रुपयांची कामे मंजूर केली जात असून झटपट बिले सुद्धा निघत असल्याने संशय व्यक्त केला जात आहे. तर यातील बहुतांशी कामे अनावश्यक स्वरूपाची असून केवळ ठेकेदारांच्या माध्यमातून शासनाचा निधी लाटता यावा यासाठी अधिकारी वर्गाची ही शक्कल असल्याची चर्चा आहे. या सर्व प्रकारची चौकशी होऊन कठोरात कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

### राजे संस्कार प्रतिष्ठानने
# विशेष मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना दिला आधार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून केलेल्या कामाला प्रदर्शन तर कुणाचं तरी चांगल व्हावं म्हणून केलेल्या कामाला निःस्वार्थ चांगुलपणा म्हणतात. याच तत्वाचा आधार घेत आषाढी एकदशीचे औचित्य साधून राजे संस्कार प्रतिष्ठानचे मावळ्यांनी पंढरपूर येथे विठ्ठलाचे दर्शन घेऊन पुण्यातील कात्रज जवळील जांभूळवाडी येथील डोंगराळ भागात आड वाटेवर असलेल्या अक्षरस्पर्श या विशेष मुलांच्या शाळेला भरपावसात प्रा. संभाजी शेळके यांचे मार्गदर्शनाखाली मदतीचा हात दिला.



प्रतिष्ठानने पोलीस निरीक्षक प्रिती चव्हाण मॅडम यांचा चि. रणवीर प्रिती सत्यजीत चव्हाण यांच्या सहकार्याने आषाढी एकादशी दिनी पंढरपूरहुन ठाण्याला जाता जाता तेथील मुलांना शालेय बॅग, पाट्या यासह अनेक शालेय उपयोगी वस्तू भेट म्हणून दिल्या. आषाढी एकादशीचे दिवशी मिळालेली भेट जणू पांडुरंगाने दिलेला आशीर्वाद भेटच असा भाव तेथील उपस्थितांच्या चेहेऱ्यावर उमटला होता. यावेळी उपक्रमात राजे संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. संभाजी शेळके यांच्यासह के बी पी महाविद्यालय ठाणे चे प प्राचार्य संतोष गावडे, प्रा. निलेश शिंदे, संदीप पेटकर आणि कृषिकेश मुळुक तसेच अक्षरस्पर्श या शाळेचे शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## कोकण विभागीय लोकशाही दिन १४ जुलैं २०२५ रोजी

नवी मुंबई : कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि.14 जुलै 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाच्या अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) राजलक्ष्मी शाह यांनी कळविले आहे.

## रेसिपी
### रेस्टॉरंटसारखी रोटी



साहित्य

गव्हाचे पीठ - दोन कप
मैदा - अर्धा कप
दही - अर्धा कप
बेकिंग पावडर- अर्धा चमचा
बेकिंग सोडा - अर्धा चमचा
मीठ - चवीनुसार
साखर - अर्धा चमचा
तेल / तूप - १ टेबलस्पून
पाणी - मळण्यासाठी
सुके पीठ - लाटण्यासाठी

कृती :

सर्वात आधी सर्वप्रथम एका भांड्यात गव्हाचे पीठ, मैदा, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा, मीठ आणि साखर मिसळा. आता त्यात दही आणि तेल घाला आणि हळूहळू पाणी घालून मऊ पीठ मळून घ्या. हे पीठ झाकून ठेवा आणि १-२ तास सेट होऊ द्या आणि पीठातून मध्यम आकाराचे पीठ बनवा. तसेच सुक्या पीठात पीठ घाला आणि रोलिंग पिनने गोल किंवा गोल रोटी लाटा. आता रोटीच्या एका बाजूला थोडे पाणी लावा आणि गॅसवर पॅन गरम करा. आता रोटीची ओली बाजू तव्यावर चिकटवा. ३०-४० सेकंदांनंतर, पॅन उलटा करा आणि रोटी थेट आचेवर शिजवा. नंतर ते चिमट्याने उलटा आणि दोन्ही बाजूंनी कुरकुरीत आणि मऊ होईपर्यंत शिजवा. आता त्यावर तूप किंवा बटर लावा आणि गरमागरम सर्व्ह करा.

# वाढीव टप्पा अनुदानासाठी पुकारलेल्या शाळा बंद
### आंदोलनास शिक्षक क्रांती संघटनेचा पाठिंबा..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : विना अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळावे यासाठी शिक्षक समन्वय संघ,महाराष्ट्र राज्य यांच्याकडून ८ व ९ जुलै रोजी पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनास शिक्षक क्रांती संघटनेने पाठिंबा दर्शविला आहे.शिक्षक क्रांती संघटनेचे सुधीर घागस यांनी असे पत्र शिक्षक समन्वय महासंघाचे खंडेराव जगदाळे,पुंडलिक रहाटे,सुरेखा इंगवले यांना दिले आहे.

विनाअनुदानित शाळांमागे असलेला कायम हा शब्द वगळलेल्या विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने स्वीकारले. प्रचलित अनुदान धोरणा नुसार दरवर्षी वेतन अनुदानाचा टप्पा २० टक्क्याने वाढत होता.परंतु कालांतराने गोर गरिबांची मुले शिकत असलेल्याया शाळांना वेतन अनुदान देण्यास शासन उदासीन दिसत आहे. शासन आदेश पारित होऊनही अनुदान वितरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्या बद्दल सुधीर घागस यांनी खंत व्यक्त करीत शासन १५ ते २० वर्षांपासून विनाअनुदानित शाळा व तुकड्यांवर काम करणाऱ्या शालेय कर्मचाऱ्यांच्या जीवनाशी शासन खेळत आहे.

शिक्षक समन्वय संघा वतीने १४ ऑक्टोबर २०२४ च्या जी.आर. नुसार वेतन अनुदान वितरणाची मागणी लावून धरण्यासाठी ८ व ९ जुलै रोजी शाळाबंद आंदोलन पुकारले आहे. त्याचबरोबर आझाद मैदान येथे ५ जून पासून धरणे आंदोलन करून वाढीव टप्पा अनुदानाची मागणी पावसाळी अधिवेशनात जोरदार पणे लाऊन धरण्याच्या मागणी साठी च्या दोन्ही आंदोलनास महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेचा पाठींबा आहे असे निवेदनात सुधीर घागस यांनी नमूद केले आहे.

### रायगड जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि स्वदेस फाउंडेशन यांच्यात
# आरोग्यासाठी सामंजस्य करार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : रायगड जिल्ह्यातील आरोग्यसेवांच्या उपलब्धतेमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढवण्यासाठी महत्त्वाचा टप्पा म्हणून स्वदेस फाउंडेशन आणि रायगड जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यात (दि.07 जुलै 2025 ) रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण यंत्रणा प्रियदर्शनी मोरे, तसेच स्वदेस फाउंडेशनचे संचालक प्रदीप साठे, तुषार इनामदार वरिष्ठ व्यवस्थापक नजीर शिकलगार व मेघना फडके व सहाय्यक व्यवस्थापक जुलेखा शेख उपस्थित होते.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या वतीने डॉ.नितीन बावडेकर, स्वदेस फाउंडेशन यांच्यावतीने मंगेश वांगे, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि डॉ.सुरेंद्र यादव, उपसंचालक आरोग्य-स्वदेस फाउंडेशन यांनी सामंजस्य करारनाम्यावर स्वाक्षरी केली. महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ.निपुण विनायक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारनाम्याचा मुख्य उद्देश शासनाच्या आरोग्यसेवा मजबूत करणे आणि ग्रामीण समुदायांसाठी दर्जेदार आरोग्यसेवा पुरवण्यात मदत करणे हा आहे. या सहकार्याद्वारे स्वदेस फाउंडेशन आणि रायगड जिल्हा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या मार्फत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकट करण्यासाठी मदत करणार आहे. ही भागीदारी समुदायावर आधारित शासकीय आरोग्य कार्यक्रमांबाबत जनजागृती वाढवेल आणि अत्यावश्यक आरोग्य सेवा शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचविण्याची खात्री करेल. रॉनी स्क्रूवाला आणि झरीना स्क्रूवाला यांची स्वदेस फाउंडेशन रायगड जिल्हामधील महाड, पोलादपूर,माणगाव, तळा, श्रीवर्धन,म्हसळा व सुधागड या तालुक्यामध्ये ग्रामीण सक्षमीकरणासाठी समग्र 360-अंश दृष्टिकोनातून कार्य करणारी स्वयंसेवी संस्था या तालुक्यामध्ये सामंजस्य करारा मुळे फायदा होणार आहे.

## आजचे राशि भविष्य



**मेष**
घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. तुमच्या आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील आणि तुमचे अनुसरण करतील.

**वृषभ**
व्यवसायात नेहमीपेक्षा चांगला फायदा होईल. आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल विद्यार्थ्यांसाठी दिवस समाधानकारक असेल, त्यांना नवीन शिकायला मिळेल.

**मिथुन**
तुम्हाला एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल, हे भाग्य समजा. आज तुम्ही सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल.

**कर्क**
विचारपूर्वक केलेल्या कृतीतून तुम्हाला फायदा होऊ शकतो. प्रयत्न केल्यास यश मिळू शकते.राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे.

**सिंह**
समाजहितासाठी केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते. नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे. घरगुती जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल.

**कन्या**
तुमचे व्यवहारही जलद होऊ शकतात.तुम्हाला एखादी मोठी जबाबदारी मिळू शकते जी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**तूळ**
तुम्ही जे काही काम करण्याचा प्रयत्न कराल, त्या कामात तुम्हाला यश मिळेल. तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल, यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**वृश्चिक**
तुम्ही आव्हानांचा सामना कराल, तुम्ही त्यांचा धैर्याने सामना कराल आणि तुम्हाला यश मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस सामान्य असेल.

**धनु**
करिअरशी संबंधित निवड तुम्हाला काही अडचणीत टाकू शकते परंतु योग्य बिंदू निवडणे चांगले होईल. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**मकर**
कोणतेही काम करताना घाई करू नका.कामाबाबत काही नवीन कल्पना मिळू शकतात. तुम्ही त्यांच्यावर लवकरच काम सुरू करू शकता.

**कुंभ**
करिअरमधील चढ-उतारांमुळे तुम्ही त्रस्त असाल, परंतु काही अनुभवी वरिष्ठांच्या मदतीने तुम्हाला आराम मिळेल. घरात मुलांसोबत चांगला वेळ घालवाल.

**मीन**
नोकरी करणाऱ्या लोकांना बढतीची संधी मिळेल. ऑफिसमध्ये चांगल्या कामगिरीसाठी तुमचा सन्मान होऊ शकतो.. आयुष्यातील सर्व समस्या दूर होतील.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५-२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी.
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# पनवेल शहराला प्लॅस्टिकचा फास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. ८ (बातमीदार)**

संपूर्ण राज्यात शासनाने प्लॅस्टिक बंदी जाहीर केली आहे. तसेच पनवेल महापालिकेने विविध मोहीम, उपक्रम राबवून प्लॅस्टिक बंदीविरोधात रान उठवले आहे; मात्र तरीदेखील शहरात पिशव्यांचा सर्रास वापर होताना दिसून येत आहे. वापरा आणि फेका या संस्कृतीची सवय जडलेल्या नागरिकांमुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. दुसरीकडे प्लॅस्टिकच्या अनिर्बंध वापरावर शासकीय यंत्रणेचा अंकुश दिसून येत नसल्याने सर्वत्र संबंधित कचरा पसरला आहे. यासाठी पालिका क्षेत्रात प्रतिबंधित प्लॅस्टिक पिशवी विक्री व वापरावरील कारवाईमध्ये सातत्य ठेवणे गरजेचे असल्याचे पर्यावरणवाद्यांकडून सांगण्यात येत आहे. प्लॅस्टिकचा कचरा वाढू लागल्याने शासनाने त्यावर बंदी आणली; परंतु त्यानंतरही शासकीय यंत्रणेकडून अंमलबजावणी होत नसल्याने त्याच्या वापरावर नियंत्रण आलेले नाही. शासनाने १ नोव्हेंबर २०११ पासून राज्यात प्लॅस्टिक बंदी केली आहे. ३५ मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांनाही बंदी आहे; मात्र सर्वत्र प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर होताना दिसून येत आहे. बाजारात ग्राहक सर्रास प्लॅस्टिक पिशव्यांची मागणी करीत असल्याचे दिसून येत आहे. वजनाने हलक्या असल्याने प्लॅस्टिक पिशव्या हवेबरोबर वाहत जाऊन पाणीसाठे, जंगल आणि जमिनीवर साचतात. मोकाट जनावरे, जलचर प्राणी अन्न समजून या पिशव्या गिळतात. त्यामुळे आतड्यात प्लॅस्टिक साचल्याने त्यांचा मृत्यू होतो. पावसाळ्यात प्लॅस्टिक पिशव्यांमुळे गटारे तुंबून पाणी साचते. डबके निर्माण झाल्याने डासांची पैदास होऊन रोगराई निर्माण होते. एवढेच नाही तर प्लॅस्टिकमधील पॉलिमर्स जमीन, पाणी व अन्नसाखळी दूषित करतात, हे मानवी आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक बाब आहे. त्यासाठी प्लॅस्टिक पिशव्यांवर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. प्लॅस्टिकच्या अतिवापराने आज विविध समस्या निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# निवेदने प्राप्त झाल्यास मद्यबंदीवर कार्यवाही

## - उपमुख्यमंत्री अजित पवार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** खारघर परिसरात प्रभागाकरिता दारूबंदी करण्याबाबत विहित प्रक्रियेनुसार निवेदन प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत विधानसभा सदस्य प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री पवार विधानसभेत बोलत होते.

सन २००८ व २००९ च्या अधिसूचनेनुसार नगरपरिषद / महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या प्रभागातील २५ टक्के पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदारांनी लेखी निवेदन दिल्यास संबंधित जिल्हाधिकारी यथास्थिती गुप्त पद्धतीने मतदान घेण्याची प्रक्रिया पूर्ण करतील. जर संबंधित प्रभागातील एकूण मतदार किंवा महिला मतदारांच्या संख्येच्या किमान ५० टक्केपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मतदान केल्यास त्या क्षेत्रात मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतात, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.


# कल्याण डोंबिवली महानगरपालिका

## महिला व बालकल्याण विभाग

### स्वयंरोजगाराकरीता अनुदान योजना

कल्याण डोंबिवली महानगरपालीका क्षेत्रातील महिलांना स्वयं रोजगार व रोजगाराच्या संधी विचारात घेऊन महिला बाल कल्याण विभागामार्फत रेझीनआर्ट, व्यायामशाळा प्रशिक्षक, परफ्युम मेकींग डिझाइनींग मेनबत्ती, हॅण्डमेड साबण, केक मेकींग, कराटे व रिक्षा चालविणे इत्यादी प्रशिक्षण देण्यात येतात तथापी अनेक महिलांना स्वयंरोजगारामार्फत स्वताःचा व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असते परंतू आर्थिक अडचणींमुळे त्या स्वताःचा व्यवसाय सुरु करु शकत नाहीत या करीता शासन योजनेअंतर्गत महिलांना अल्प व्याजदरात कर्ज बँकांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येते.

सदरची योजना ही दारीद्र रेषेखालील महिला, अनुसुचीत जाती जमाती प्रवर्गातील महिला, अल्पसंख्यांक समाजातील महिला यांनाच लागू आहेत. कल्याण डोंबिवली महापालीका क्षेत्रातील स्वयंरोजगाराकरीता बँकेमार्फत कर्ज घेतले आहे तसेच जिल्हा उद्योग केंद्र यांचेमार्फत राबविण्यात येणा-या मुख्यमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रम व इतर शासकीय योजनेतून कर्ज घेतले आहे अशा सर्वच प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या मागास महिलांना महापालीकेच्या महिला बालकल्याण अंतर्गत महिला व बालकांकरीता राखीव ठेवण्यात येणा-या ५ टक्के निधी मधुन अर्थसहाय्य करण्यात येत आहे. याकरीता खालील अटी व शर्ती पुर्ण करण्या-या महिलेस रु २५०००/- (अक्षरी रक्कम रु पंचवीस हजार मात्र) एक रकमी त्यांच्या खात्यात डि.बी.टी स्वरुपात देण्यात येईल.

**योजनेच्या अटी व शर्ती**

१. महिलेने महापालीकेच्या महिला बालकल्याण विभाग अथवा एन.यु.एल.एम विभागामार्फत प्रशिक्षण घेतलेले असणे आवश्यक आहे.
२. स्वयं रोजगारासाठी बँकेमार्फत शासकीय योजनेअंतर्गत ज्या गोष्टीचे प्रशिक्षण घेतले आहे त्याच गोष्टीकरीता कर्ज घेतलेले असले पाहीजे व त्याची नियमीत परतफेड करणे आवश्यक आहे.
३. कर्जाची संपूर्ण रक्कम परतफेड केल्यानंतर बँकेमार्फत देण्यात येणारा ना हरकत दाखला सादर करणे बंधनकारक राहील.
४. चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती जोडणे बंधनकारक आहे. कुटुंबांचे कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात किमान 3 वर्ष वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून मालमत्ता धारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती / निवडणूक ओळखपत्र / मतदार यादीतील नांव / पाणीपट्टी / वीज बिल / आधारकार्ड / 3 वर्षांचा भाडे करारनामा / पारपत्र (Passport) रेशनकार्ड, विवाह नोंदणी दाखला, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल.
५. अर्जदाराने पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
६. ज्या महिलेच्या कुटुंबाचे त्या कुटुंब प्रमुखाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. 2,40,000/- आत असलेबाबत मा. तहसिलदार कल्याण यांची उत्पन्न दाखला सोबत जोडणे आवश्यक आहे.
७. ज्या आर्थिक वर्षात कर्ज फेडले असेल त्याच आर्थिक वर्षात अर्ज सादर करणे बंधनकारक असेल.
८. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.
९. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायाचित्रे सक्षम अधिकाऱ्यांने प्रमाणित केलेली असावीत.
१०. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अर्थसहाय्य मंजूर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहिल.
११. ज्या लाभार्थ्यांनी याआधी या योजनेचा लाभ घेतलेला आहे अशा व्यक्तींना या योजनेअंतर्गत अर्ज करता येणार नाही.
१२. बँकेचे पासबुकची स्पष्ट छायांकित प्रत तसेच रद्द केलेला धनादेश अर्जासोबत देणे.
अर्ज करण्याची अंतिम दिनांक ०८/०८/२०२५

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/२७६
दिनांक : ८ जुलै २०२५

सही/-
(कांचन गायकवाड)
उप आयुक्त, महिला व बालकल्याण कल्याण डोंबिवली महानगरपालिका


# वाहतूक कोंडीने अडवली रुग्णवाहिकांची वाट

## ■ वाहतूककोंडीचा रुग्णवाहिकांना फटका



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशी, ता. ८ (बातमीदार)**

ठाणे-बेलापूर मार्गावरील रबाळे टी जंक्शनजवळील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग मंदावत असून या ठिकाणी अनेक वेळा वाहतूक कोंडी होत असते. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकण्याचे प्रकार समोर येत आहेत. यामुळे रुग्णांसह नातेवाइकांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

ठाणे-बेलापूर मार्गावर वाशीकडून ठाण्याकडे जाणाऱ्या मार्गावर रबाळे टी जंक्शनजवळ रस्त्यांना पावसामुळे खड्डे पडले आहे. तर या सखल भागात संततधार पाऊस सुरू राहिल्यास पाणी साचून वाहने बंद पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे रबाळे टी जंक्शनपासून रबाळे रेल्वेस्थानकापर्यंत वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकण्याचे प्रकार घडत आहेत.

वाशी येथील पालिका रुग्णालयात अपुऱ्या सुविधांमुळे कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालय त्याचप्रमाणे जळालेल्या व्यक्तीसाठी ऐरोली येथील बर्न हॉस्पिटल या ठिकाणी रुग्णांना पाठवण्यात येते. त्यामुळे रबाळे ते घणसोलीपर्यंत मार्गावरील वाहतूक कोंडीचा रुग्णांना सामना करावा लागतो आहे. तर अंतर्गत रस्त्यांनादेखील खड्डे पडलेले आहे. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकत असल्याने रुग्ण दगावण्याचीही शक्यता आहे.

**बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करावी**

रबाळे टी जंक्शनपासून रबाळे रेल्वेस्थानकापर्यंत वाहतूक कोंडी ही नित्याचीच होत आहे. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका सायरन वाजवत असतानादेखील काही चालकांकडून वाट मोकळी करून दिली जात नाही. अशा बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी. तर रबाळे टी जंक्शनजवळ पडलेले खड्डेदेखील बुजवण्यात यावे, अशी मागणी नागरिक सचिन पाटील यांनी केली आहे.

# मलंगगड भागात पर्यटकांचा धिंगाणा

## स्थानिक ग्रामस्थांकडून कारवाईचा ईशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. ८ :**

ठाणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू असल्याने मलंगगड भागातील नदी, ओहोळ किनारी परिसरात पर्यटकांच्या पार्ध्या सुरू झाल्या आहेत. कुशिवली, खरड, ढोके गावच्या परिसरात पर्यटक गर्दी करू लागले आहेत; मात्र पर्यटकांना नदीपात्राचा अंदाज नसल्याने अनेकदा अपघात घडतात. तसेच येणारे पर्यटक हे परिसरात धिंगाणा घालत असल्याने त्याचा गामस्थांना त्रास होत आहे.

यामुळे ग्रुप ग्रामपंचायत खरडने खरड डोंगरीवर पर्यटकांना येण्यास सक्त मनाई केली आहे. तसेच पर्यटकांनी धिंगाणा घातल्यास कायदेशीर कारवाईचा इशारादेखील देण्यात आला आहे.

हिरवाईने नटलेला मलंगगड परिसर पर्यटकांना खुणावू लागला आहे. काही दिवसांपासून मुसळधार पाऊस या भागात पडत आहे. त्यामुळे नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत. सुट्टीच्या दिवशी शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण मंडळी या भागात येत आहेत. यात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कळवा, मुंब्रा, कल्याण डोंबिवली, अंबरनाथ भागातील पर्यटकांचा मोठा सहभाग असतो. अतिउत्साही पर्यटक नदीपात्रात कुठेही उड्या मारतात. नदीकिनारी ओल्या पार्थ्या करतात. मद्यपान केल्यानंतर ते धिंगाणा घालतात. सर्रास असे चित्र ग्रामीण भागात दिसू लागले आहे.

अनेकदा तरुणांना नदीपात्रातील खोलीचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून अनेकांचा मृत्यू झाल्याची घटना घडल्या आहेत. स्थानिक ग्रामस्थांनी एखाद्या ठिकाणी पाण्यात उतरू नका, धोका आहे असे सूचित केले तरी पर्यटक त्यांचे न ऐकता पाण्यात उतरतात. अतिउत्साही पर्यटकांच्या धिंगाण्यामुळे ग्रुप ग्रामपंचायत खरडने पर्यटकांसाठी एक सूचना जारी करत त्याचा फलक मलंगगड भागात लावला आहे.

ग्रामपंचायत खरडअंतर्गत येणाऱ्या आंभे, डोके, कुशिवली, खरड गावातील ग्रामस्थांनी या सूचनेला संमती दर्शवली आहे. ग्रामपंचायतीच्या म्हणण्यानुसार शहरातील पर्यटक दारू पिऊन अश्लील चाळे करतात, दारूच्या बाटल्या फोडतात, लाज वाटेल असे कृत्य करत असल्याने ग्रामीण भागातील संस्कृती बिघडत आहे.

डोंगरीजवळ आई गावदेवी मंदिर, महादेव मंदिर असून, ते ग्रामस्थांचे श्रद्धास्थान आहे. पर्यटकांच्या वागण्याने त्याचे पावित्र्य भंगत आहे. ग्रामपंचायत खरड क्षेत्रात असे प्रकार मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. अशा पर्यटकांमुळे स्थानिक नागरिकांना मोठा त्रास होत आहे. म्हणून पर्यटकांना या भागात येण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे. पर्यटकांनी धिंगाणा केल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अधिसूचनेला विरोध शुक्रवारी खासगी आरोग्य सेवा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण - महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना नोंदणीची परवानगी देण्याची अधिसूचना काढली आहे. या निर्णयाविरुद्ध भारतीय वैद्यकीय संघटनेने (आयएमए) ११ जुलै, शुक्रवारी राज्यव्यापी २४ तास आरोग्य सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या बंदमध्ये आयएमएच्या कल्याण शाखेने सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.**

यासंदर्भात कल्याणचे तहसीलदार यांना एक मंगळवारी निवेदन देण्यात आले आहे. या बंदनंतर मुंबईत एक भव्य फेरी काढण्यात येणार आहे, असे भारतीय वैद्यकीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

खासगी वैद्यकीय आरोग्य सेवा बंदबाबत मंगळवारी कल्याण आयएमएच्या अध्यक्षा डॉ. सुरेखा ईटकर, डॉ. राजेंद्र लावणकर, डॉ. अश्विन कक्कर, डॉ. विकास सुरंजे, डॉ. स्नेहलता कुरीस, डॉ. स्मिता महाजन, डॉ. राजन माने, डॉ. विद्या ठाकूर यांनी कल्याण तहसीलदार कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि शुक्रवारच्या बंदसंदर्भात एक निवेदन दिले.




महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने ३० जून २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या वादग्रस्त अधिसूचनेचा आयएमए महाराष्ट्र शाखेने तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. एक वर्षाचा मॉर्डन फार्मसीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणीची परवानगी देण्यात आली आहे. हा निर्णय वैद्यकीय शिक्षण व्यवस्थेत अराजक माजविणारा आणि नैतिकतेचा अवमान करणारा आहे. रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे, अशा शब्दात अध्यक्षा डॉ. सुरेखा ईटकर यांनी निवेदनाच्या माध्यमातून अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले आहे.

ही वादग्रस्त अधिसूचना रद्द करण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर तातडीने प्रयत्न करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. ही अधिसूचना शासनाने रद्द केली नाहीतर राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा आयएमएने दिला आहे.

# अंबरनाथमध्ये गळा चिरून एकाची हत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** अंबरनाथ पूर्वेतील शिवाजी नगर भागात असलेल्या शिवसेना शाखेच्या जवळच्या वर्दळीच्या चौकात एका व्यक्तीची गळा चिरून हत्या केल्याची घटना घडली आहे. हा व्यक्ती ३४ वर्षांचा असून भर चौकात मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या स्थळापासून शिवाजीनगर पोलीस ठाणे अवघ्या काही अंतरावर आहे. या ठिकाणी असलेला एक सीसीटीव्ही कॅमेरा राजकीय पक्षाच्या बॅनरने झाकला गेल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यामुळे तपासात आरोपी कैद होऊ शकलेले नाहीत. या भागात कायम वाहनांची आणि माणसांची गर्दी असते. मात्र याच भागात एका व्यक्तीचा गळा चिरलेला मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

# तीन दुचाकींसह चोरट्याला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**कल्याण, ता. ८ :** चिकणीपाडा परिसरातील एका व्यावसायिकाची बुलेट दुचाकी चोरीला गेल्याने या व्यावसायिकाने कोळसेवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. उल्हासनगर गुन्हे शाखेने या दुचाकी चोरी करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेत त्याला कोळसेवाडी पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. पोलिसांच्या अटकेत असलेल्या आरोपीने तीन दुचाकी वाहनांची चोरी केली होती. उल्हासनगर गुन्हे शाखेने आरोपीची माहिती काढली असता तो एका नामांकित कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून काम करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार कंपनीकडून माहिती व पत्ता मिळवत त्याला ताब्यात घेण्यात आले. आकाश नागरे (२५) असे या आरोपीचे नाव आहे. चौकशीदरम्यान शोध घेत तिन्ही वाहने जप्त केली आहेत.

# अकरावीच्या पहिल्या फेरीत सहा हजार विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** अकरावी प्रवेशाची पहिली फेरी ७ जुलै रोजी संपुष्टात आली. या फेरीमध्ये ५ लाख ८ हजार ९६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असले तरी राज्यभरातील विविध महाविद्यालयांनी निरनिराळ्या ① । कारणास्तव ६ हजार ४०२ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले. यापैकी दोन हजार १९३ विद्यार्थ्यांनी कोट्यांतर्गत प्रवेशासाठी प्रयत्न केला होता. मात्र त्यांना कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेश नाकारला.

राज्यभरात यंदा प्रथमच अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने



राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी राज्यामध्ये ९ हजार ४६९ महाविद्यालयांमध्ये २१ लाख २३ हजार ७२० इतक्या जागा उपलब्ध आहेत. यातील १६ लाख ७० हजार ५९८ नियमित फेऱ्यांसाठी, तर ४ लाख ५३ हजार १२२ जागा कोट्यांतर्गत प्रवेशासाठी राखीव आहेत. शिक्षण संचालनालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार पहिल्या फेरीनंतर ५ लाख ८ हजार ९६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. यामध्ये कोट्यांतर्गत ७५ हजार ८०९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले, तर नियमित फेरीअंतर्गत ४ लाख ३२ हजार २८७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. मात्र राज्यातील महाविद्यालयांनी विविध कारणास्तव ६ हजार ४०२ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले आहेत. यामध्ये कोट्यांतर्गत प्रवेशासाठी प्रयत्न केलेल्या २ हजार १९३ विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेश नाकारले आहेत. त्याखालोखाल विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणारे २ हजार ४९५, तसेच वाणिज्य शाखेसाठी ९५६ आणि कला शाखेसाठी ७५८ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आले आहेत. योग्य कागदपत्रे सादर न केल्याने, तसेच अर्जामध्ये चुका करण्यात आल्याने या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आल्याची माहिती शिक्षण संचालनालयाचे सहसंचालक श्रीराम पानझडे यांनी दिली.

# बिबट्याच्या हल्ल्यात वासराचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डहाणू :** डहाणू तालुक्यातील नरपड भागात बिबट्याच्या हल्ल्यात एका वासराचा मृत्यू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवार ८ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास नरपड येथील कल्पेश पाटील यांच्या वाडीत शिरून बिबट्याने वासराला लक्ष्य केले.

या हल्ल्यात वासराचा जागीच मृत्यू झाला. गेल्या काही वर्षांपासून डहाणू आणि तलासरी तालुक्यातील काही भागांमध्ये बिबट्याचा वावर सातत्याने दिसून येत आहे. बिबट्या मानवी वस्तीत येऊन पाळीव प्राण्यांवर हल्ला करण्याच्या घटना वाढल्या आहेत. यापूर्वीही बिबट्याने कोंबड्या, कुत्रे, वासरे, बकरी यांसारख्या लहान प्राण्यांना लक्ष्य केले असून तलासरी तालुक्यातील आंबेसरी भागात एक महिला आणि एका पुरुषावर हल्ला केल्याची घटना समोर आली होती. दोन वर्षांपूर्वी नरपड येथे एका म्हशीच्या वासराला बिबट्याने लक्ष्य केले होते. या वाढत्या घटनांमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये दहशत आहे. वनविभागाकडून हल्ल्यात जखमी नागरिकांना आणि पशू पालकांना भरपाई देण्यात येते. मात्र बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी अथवा त्याला पकडून नैसर्गिक अधिवासात पाठवण्यासाठी कोणत्याही उपाययोजना करण्यात येत नसल्याचे समोर येत आहे.




# भिवंडी मनपाच्या शाळांमध्ये साक्षरता दिंडीचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये "नवभारत साक्षरता अभियान" अंतर्गत साक्षरता दिंडीचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले.

या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी रुक्मिणीमातेचे पात्र साकारले तसेच वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी होत साक्षरतेचा संदेश दिला. वारीच्या माध्यमातून "नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा" प्रचार व प्रसार करण्यात आला. विविध घोषवाक्य, फलक, पोवाडे आणि भजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे महापालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर, अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त श्री. बाळकृष्ण क्षीरसागर, सहायक आयुक्त श्री. अजित महाडिक, तसेच प्रशासन अधिकारी श्री. सौदागर शिखरे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले व उपक्रमाचे कौतुक केले. या साक्षरता दिंडीने विद्यार्थ्यांमध्ये साक्षरतेबाबत जागरूकता निर्माण केली असून, समाजातही या अभियानाविषयी सकारात्मक संदेश पोहोचविण्यात आला आहे.



## भाजप तालुका अध्यक्ष शेखर लोणे यांच्या वाढदिवसानिमित्त
# एक वृक्ष-एक जीवन अभियान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : एक वूक्ष -एक जीवन अभियान अतगैत तसेच भारतीय जनता पार्टी कल्याण ग्रामीणच्या वतीने व भाजपचे कल्याण तालुका अध्यक्ष शेखर लोणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून चिंचवली येथे वृक्षारोपणाचा एक सुंदर उपक्रम भाजपा ठाणे ग्रामीण जिल्हाअध्यक्ष जितेंद्र डाकी यांच्या प्रमुख उपस्थित राबवण्यात आला.

"एक वृक्ष : एक जीवन" या प्रेरणादायी संकल्पनेतून पर्यावरण रक्षणाचा जागर करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक रविंद्र घोडविंदे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राजाराम चौधरी, ठाणे जिल्हा परिषद माजी सदस्या रेश्माताई मगर, कल्याण परिक्षेत्र वन अधिकारी निलेश आखाडे, वन अधिकारी राजू शिंदे, खडवली बीटचे वन अधिकारी सचिन तळपडे, चिंचवली -उतणे ग्रामपंचायत सरपंच संजना कशिवले, आधार दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष भगवान शिरोसे, समाजसेवक पद्माकर हरड, सदाशेट मोरे, रविंद्र जाधव, कमलाकर कशिवले, चिंतामण मगर, मंगेश शेलार, सुनील देसले गुरुजी, संजय शेलार, दिनेश कशिवले, राजू मगर, अनंता दोरलेकर, संजय जाधव व सरपंच, सदस्य,पदाधिकारी, निसर्गप्रेमी सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. तालुका अध्यक्ष शेखर लोणे यांनी आभार मानले,

# महावितरणचा लाचखोर उपअभियंता एसीबीच्या जाळ्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये (MSEDCL) पेण मंडळ कार्यालयात कार्यरत असलेल्या उपअभियंता संजय जाधव यांनी तक्रारदाराकडे पोल शिफ्टिंगसाठी २५ हजार रुपयांची लाचेची मागणी केली होती. तडजोडीनंतर ही रक्कम १५ हजार रुपयांवर आली. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली.

नवी मुंबई लाचलुचपत विभागाने योग्य नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचत मंगळवार, ८ जुलै २०२५ रोजी लाचखोर उपअभियंता संजय जाधव यांना पाच हजार रुपये लाच घेताना रंगेहात अटक केली. ही कारवाई पेण परिसरात करण्यात आली असून आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते. नवी मुंबई लाचलुचपत विभागाच्या या यशस्वी कारवाईमुळे प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर वचक बसण्याची शक्यता असून, सर्वसामान्य जनतेला न्याय मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

# कल्याण शहरातील खड्ड्यांची महापालिकेकडून दखल
## खड्डे भरण्याचे काम प्रशासनाकडून युद्धपातळीवर होणार
### – शहर अभियंता अनिता परदेशी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवलीत ठिकठिकाणी, विशेषतः डांबरी रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची प्रशासनाने गांभिर्याने दखल घेतली असून हे खड्डे भरण्याचे काम युद्धपातळीवर केले जाणार असल्याची माहिती कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी यांनी दिली आहे. तसेच कल्याण डोंबिवलीतील सर्वच रस्ते टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीटचे करण्याचे काम सुरू असून तोपर्यंत नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

यंदा चक्क 10 मे पासूनच पावसाला सुरूवात झाली आहे. त्यातच गेल्या आठवड्याभरापासून किंवा त्याहीपेक्षा अधिक दिवसांपासून कल्याण डोंबिवलीमध्ये जोरदार पाऊस पडत आहे. परिणामी सिमेंट काँक्रीटीकरण न झालेल्या डांबरी रस्त्यांवर काही प्रमाणात खड्डे पडले असून त्याचा नागरिकांनाही मोठा त्रास होत आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी यांनी शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची वस्तुस्थिती मान्य केली. या डांबरी रस्त्यांवरील खड्ड्यांची महापालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम वेगाने केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले . सध्या पावसाचा जोर वाढलेला असल्याने रस्त्यांवर पडलेले हे खड्डे भरण्यासाठी कोल्ड मिक्स, स्टोन क्रश आदी पद्धत वापरण्यात येत असून ही दुरुस्ती तात्पुरत्या स्वरूपात केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



सर्वच रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण करण्याच्या दिशेने वाटचाल...

दरम्यान कल्याण डोंबिवली शहरातील सर्वच प्रमुख रस्ते हे सिमेंट काँक्रीटचे केले जाणार असून त्यापैकी काही रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. तर काही रस्त्यांची कामे अंतिम टप्प्यात आली असल्याचे सांगत येत्या काळात टप्प्याटप्प्याने सर्वच रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहनही शहर अभियंता अनिता परदेशी यांनी केले आहे.




# ठाणे जिल्हा माहिती कार्यालयातील 'टेरेस गार्डन' ला जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या छतावर "WASTE TO BEST" या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या "टेरेस गार्डन" ला जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी काल (दि.7 जुलै रोजी) भेट दिली. यावेळी पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी यांनी त्यांना टेरेस गार्डनबाबत तसेच झाडांचे संगोपन, थ्रेड टू ट्रेंड याविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी ठाणे जिल्हा सैनिक कल्याण समितीचे नागरी सदस्य दिलीप गुप्ते, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुनिल भाट, जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी राजू भोये, स्वरुप हुले उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे म्हणाले की, टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ, उपयोगी, स्वस्त अशी वस्तू निर्माण करणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. 3R म्हणजेच रिड्यूस, रियूज आणि रिसायकल या तत्वांचा अवलंब करून या गार्डनमधील वस्तू बनवलेल्या असून आपली जीवनशैली याच तत्वांवर उभी करणे गरजेचे आहे.

ते पुढे म्हणाले की, निसर्गपूरक व निसर्गसंवर्धन अशा पद्धतींचा अवलंब आपल्या जीवनाचा भाग बनावा, ही शासनाची अपेक्षा आहेच, तोच धागा पकडून आपणही या कार्यात झोकून देवूयात. जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक करावे तितके कमी आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेले 'लोकराज्य' मासिक जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने भेट दिले. तसेच भारतीय सैन्यदलाच्या महाराष्ट्रातील शौर्य पुरस्कार विजेत्या अधिकारी-जवानांवरील 'महारथी महाराष्ट्राचे' या पुस्तकांचे 4 भाग जिल्हाधिकारी श्री.शिनगारे यांना लेखक तथा ठाणे जिल्हा सैनिक कल्याण समितीचे नागरी सदस्य दिलीप गुप्ते यांनी भेट दिले.

## मोंहडुळ येथील नवोदय महाविद्यालयाच्या
# शिक्षकांचे सामुदायिक रजा आंदोलन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या मोंहडुळ येथील नवोदय विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतनाअभावी सामुदायिक रजा आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

नवोदय विद्यामंदिर येथे मोंहडुळ परिसरातील खेडी, गाव, पाड्यातील ५ ते १२ वी पर्यंतचे ११२ विद्यार्थी शिक्षण घेत असुन ९ ते १३ वर्षे विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी इमाने इतबारे करीत आहेत. मात्र संस्था व्यवस्थापनाच्या ढिसाळ कारभारामुळे काही शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १ वर्षापासून तर कांहीचे ६ महीन्यांपासुन वेतन थकल्याने शिक्षकांना वेतनाअभावी वैयक्तिक व कौटुंबिक आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. दरम्यान मोंहडुळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच व समाजसेवक शरद जाधव यांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शिक्षक व संस्था व्यवस्थापन यांच्यात मध्यस्थी करून शिक्षकांचे थकलेले अर्धे वेतन जुन मध्ये व उर्वरित वेतन जुलै मध्ये देण्याचे व शिक्षकांना शासनाकडून वैयक्तिक मान्यता मिळवुन देण्याचे शाळा संस्था व्यवस्थापनाने कबुल केले होते मात्र पाठपुरावा करूनही त्यांनी काहीच कार्यवाही केली नसल्याचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे म्हणणे असुन सात दिवसांत सकारात्मक कार्यवाही न झाल्यास त्यांनी १५ जुलै पासून सामुदायिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतला असुन तशा आशयाचे निवेदन शिक्षणाधिकारी पंचायत समिती भिवंडी यांना देण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी शाळा संस्था व्यवस्थापनावर असेल असा इशाराही देण्यात आला आहे.

# पलावा पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे
## – मनसे नेते राजू पाटील

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पलावा पुलामुळे राजकारण चांगलेच तापले असून मनसे नेते माजी आमदार राजू पाटील यांनी सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका करताना पुलाचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले आहे. भीतीपोटी पुलाचे घाईत लोकार्पण केलं. सत्ताधारी ठेकेदाराला काही बोलत नाहीत ते खाल्ल्या मिठाला जागतायत, या पुलावर लोकांचे बळी जातील त्यामुळे पुलाच्या रस्त्याची दुरुस्ती करून मगच पूल सूरु करावा अशी मागणी पाटील यांनी केली.



घाई घाईत या फुलाचे लोकार्पण केलं, त्यानंतर मोटरसायकलचा अपघात झाला. पुल पुन्हा बंद केला, ग्रीट पावडर टाकून पुल पुन्हा सुरू केलाय, मात्र पुलाचं काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. सत्ताधारी ठेकेदाराला काही बोलत नाही, कारण ते खाल्ल्या मिठाला जागतायत. दीडशे कोटींचा फुल सात आठशे कोटी पर्यंत पैसे खाण्यासाठी नेला. पूल चालू करताना आमच्यावर टीका केली त्यांनी काहीही करायचं ते सहन करण्यात आलं, मी नाही सहन करणार त्यांचे मित्र पक्ष सहन करत असतील मनसे सहन करणार नाही. या पुलाचे साधे गार्डन लॉन्च केले तेव्हा फटाके वाजवले मात्र या पुलाचं लोकार्पण करताना त्यांना भीती होती. या पुलावर लोकांचे बळी जाऊ शकतात त्यामुळे लवकरात लवकर पुलाची देखभाल दुरुस्ती करावी अशी मागणी मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी केली.

या पुलाबाबत पोलिसांकडे तक्रार करण्यापेक्षा लाच लुचपत विभागाकडे तक्रार करा, पोलीस फार फार तर ठेकेदाराला नोटीस देतील मात्र त्याला काही अर्थ नाही. अत्यंत मोठ्या प्रमाणात एकंदरीतच खूप भ्रष्टाचार झालेला आहे, ठेकेदाराचे आणि त्याच्या इतर सेल कंपन्या त्यांची चौकशी करण्यात यावी, तेव्हा इथलं काळं लबोर बाहेर येईल अशी टीका राजू पाटील यांनी केली.

## मनसे नेत्याला अटक केल्याच्या निषेधार्थ
# भिवंडीत कार्यकर्त्याचा आत्मदहनाचा प्रयत्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अविनाश जाधव यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केलेली कारवाई चुकीची आहे त्यांना तात्काळ सोडून द्यावे व मराठी माणसावर होणार अन्याय दूर करावा.या मागणी साठी भिवंडीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एका मनसेच्या पदाधिकाऱ्यांने अंगावर रॉकेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला मात्र निजामपूरा पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन तातडीने त्यास ताब्यात घेतले आहे.

मीरा भाईंदर येथे अमराठी व्यापाऱ्यास मारहाणी नंतर अमराठी व्यापाऱ्यांनी काढलेल्या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून मराठी भाषिकां तर्फे मंगळवारी मीरा भाईंदर येथे त्याच ठिकाणी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अविनाश जाधव यांना पहाटेच्या सुमारास ताब्यात घेत स्थानबद्ध करून ठेवले होते.त्यामुळे मनसेचे कार्यकर्ते तीव्र नाराज झाले असुन त्यांनी या प्रकरणी निषेध व्यक्त करीत असतानाच अविनाश जाधव यांना तात्काळ सोडावे व मराठी माणसांवरील अन्याय थांबवावा या मागणीसाठी भिवंडीतील मनसे विभाग प्रमुख सुशील आवटे यांनी आज दुपारी छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती निजामपुरा पोलिस ठाण्याचे पोलीस अधिकारी राजेश दळवी व दिपक पाटील यांना कळताच त्यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेऊन प्रसंगावधान दाखवत सुशील आवटे यास ताब्यात घेऊन पुढील अनर्थ टाळला.या वेळेस सुशील आवटे यांने जोरदार घोषणाबाजी केली.निजामपूरा पोलिसांनी या प्रकरणी नोंद घेत कारवाई सुरू केली आहे.

## श्रीकांत शिंदेंच्या प्रयत्नाने
# डांबिवलीत महानगरचा घरगुती गॅस पुरवठा

### आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते योजनेचा शुभारंभ



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण लोकसभा मतदार संघातील घराघरात पाईपलाईन द्वारा गॅस पुरवठा करण्याचा संकल्प करत हा संकल्प खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी यशस्वी केला आहे. २०१४ पासून आतापर्यंत मागील ११ वर्षात अंबरनाथ ते कळवा परीसरातील बहुसंख्य भागात गॅस पुरवठा चालू करण्यात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना यश आले आहे. डोंबिवली पूर्वच्या बहुसंख्य भागात सुद्धा घरगुती गॅस पुरवठा करण्यात आला आहे मात्र आता खासदार डॉ शिंदे यांच्या यशस्वी पाठपुराव्युळे तसेच त्यांच्या अथक प्रयत्नातून डोंबिवली पश्चीमेत गॅस वाहिन्याचे जाळे निर्माण करत या भागात पाईप लाइन द्वारे गॅस पुरवठा करण्याचे काम यशस्वी झाले आहे. खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून गॅसवाहिनी साठी लागणारी स्टील लाईन रेल्वे रुळा खालून टाकण्यासाठी रेल्वे कडून परवानगी मिळवून देण्याबरोबरच या वाहिन्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले होते या प्रयत्नातून अखेर आज पहिल्या टप्प्यात डोंबिवली पश्चिमेकडील श्रीकर कृपा सोसायटी या गृहसंकुलात खासदार डॉ. शिंदे ह्यांच्या सुचने वरून कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते घरगुती गॅस पुरवठा चालू करण्यात आला.

यावेळी स्थानिक नगरसेविका मनिषा धात्रक, डोंबिवली शहर सचिव संतोष चव्हाण, डोंबिवली पश्चिम शहर संघटक केतकी पोवार, उपजिल्हासंघटक किरण मोंडकर, संपर्क संघटक कविता गावंड, पूर्व संघटक स्वाती हिरवे, युवासेना राहुल म्हात्रे, संजय पावशे आणि शिवसेना भाजपाच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्याप्रमाणात उपस्थित होत्या.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024